जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३० दिनांक - १२/०१/२०२४**

चंदननगर पोलिस स्टेशन पुणे शहर

## प्रतिबंधित चायनीज नायलॉन मांजा विक्री करणारे यांचेवर कारवाई केलेबाबत

दि.१०/०१/२०२४ रोजी २२.०० वा ते दि.११/०१/२०२४ रोजी ०२.०० वा पर्यंत मा.पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे आदेशाने पोलीस स्टेशन हद्दीत कोंबींग ऑपरेशन राबविण्यात येत होते. कोंबींग ऑपरेशन दरम्यान चायनीज नॉयलॉन मांजा विक्री करणारे विक्रीते विरुद्ध कारवाई करणेबाबत मा.सहा.पो.आयुक्त येरवडा विभाग,पुणे यांनी आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस स्टेशन हद्दीत कोंबींग ऑपरेशन करीत असताना, पो.अमंलदार तुषार आल्हाट व सुहास निगडे यांना गोपनीय बातमीव्दारे माहिती मिळाली की, बालाजी नगरकडे जाणारे रोडवर,बालाजी नगर,वडगावशेरी, पुणे येथे नवीन बांधकाम चालु असलेल्या पत्र्याचे शेडमध्ये दोन इसम बंदी असलेला पतंग उडविण्याचा प्रतिबंधित चायनीज नायलॉन मांजा विक्री करीत आहे. त्यानुसार वरील नमुद स्टाफने सदर ठिकाणी छापा घातला असता, तेथे १) सैफ वाजीदअली खान वय २६ वर्षे, बालाजी नगर, गुरुव्दाराचे शेजारी, वडगावशेरी, पुणे २) एक अल्पवयीन वय १७ वर्षे, रा.वडगावशेरी,पुणे हे त्यांचे जवळील पांढरे रंगाचे पोत्यामध्ये पतंग उडविण्याचा प्रतिबंधीत नायलॉन मांज्याचे रिळ (गट्टु) विक्री करीत असताना मिळुन आले. त्यांचे ताब्यातुन ४५,६००/- रु.कि.चा नायलॉन मांज्या जप्त करण्यात आलेला आहे.

सदर बाबत चंदननगर पोलीस स्टेशन गु.रजि.नं.२०/२०२४,भा.दं.वि.कलम १८८,३३६,पर्यावरण संरक्षण कायदा सन १९८६ चे कलम ५ अन्वये गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त,पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त,परिमंडळ-४, पुणे शहर,श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा.पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे श्री.संजय पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,चंदननगर पोलीस स्टेशन पुणे,श्री.राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक,(गुन्हे),श्रीमती मनिषा पाटील, मा.सहा पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे यांचे कार्यालयातील सहा.पो.निरी गणेश कवितके, पो.अमंलदार निलेश शिर्के, सुहास निगडे, तुषार आल्हाट, गणेश डोंगरे व चंदननगर पोलीस स्टेशन कडील सहा.पो.निरी निलेश घोरपडे, पो.अमंलदार सचिन कळसाईत, पंकज मुसळे, अशोक थोरात, श्रीरामे यांनी केलेली आहे.